


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २९२ •गुरूवार,दि.२२ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



*विसाव्या शतकातील महान संत श्री ह भ प वै. सदगुरू किसन बाबा महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व ह भ प गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज मठाधिपती श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह वर्ष ७५ वे अमृत महोत्सवी वर्षाची मंगळवारी सांगता झाली त्याचे संपूर्ण दहा दिवस कव्हरेज दैनिक मराठवाडा पत्र च्या टीमने दिले होते, बुधवारी दैनिक मराठवाडा पत्रचे अवलोकन करतांना बाबां छायाचित्रात दिसत आहेत. (छाया राजेंद्र आमटे )*

# आधी एकमेकांच्या लाजा काढल्या! आता सत्तेत राहण्यासाठी एकत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत कोणत्याही एका पक्षाला बहुमत न मिळाल्यामुळे भाजप आणि शिंदे सेनेत रस्सीखेच सुरु असताना बुधवारी कोकण विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात नाट्यमय राजकीय घडामोडी घडताना दिसल्या. आज शिंदे सेनेचे ५३ नगरसेवक याठिकाणी आपल्या गटाची नोंदणी करण्यासाठी आले होते. त्याचवेळी मनसेचे राजू पाटील




हेदेखील आपले ५ नगरसेवक घेऊन याठिकाणी पोहोचले. त्यानंतर राजू पाटील, श्रीकांत शिंदे आणि नरेश म्हस्के यांच्यात एक छोटेखानी बैठक पार पडली. या बैठकीनंतर मनसेने केडीएमसीत सत्तास्थापनेसाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिल्याचे जाहीर केले. कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात मनसेच्या नेत्यांनी भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या ▶ उर्वरित पान २ वर

# शिवसेना कोणाची? बाळासाहेब ठाकरे यांच्या जंयतीदिनी ठरणार

**नवी दिल्ली**

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाची सुनावणी पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. शुक्रवारी २३ जानेवारीपासून ही सुनावणी होणार आहे. शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचे याबाबतची अंतिम सुनावणी आजपासुन सर्वोच्च न्यायलायत सुरु होणार होती.

सुनावणी सुरु होण्यापूर्वीच पुढची तारीख मिळाली आहे.




येत्या २३ जानेवारीपासून सुनावणी सुरु होणार आहे, विशेष म्हणजे २३ जानेवारी रोजी शिवसेना स्थापन करणारे बाळासाहेब ठाकरे यांची जयंती असून हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीदिनी सुनावणीला सुरुवात होऊन जन्मशताब्दी वर्षात तरी पक्ष आणि चिन्ह कोणाचे याचा निर्णय होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या नाव आणि चिन्हाबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. आज अंतिम सुनावणी घेऊन पुढील दोन-तीन दिवसांमध्ये निर्णय येण्याची शक्यता होती. मात्र आज पुन्हा एकदा सुनावणी पुढे ढकलण्यात आली. २१ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुनावणी घेतली जाईल असे आज कोर्टाकडून सांगण्यात आले.

अंतिम सुनावणीसाठी पाच तासांचा वेळ उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या वकिलांना देण्यात ▶ उर्वरित पान २ वर

# धक्कादायक! बीडमध्ये ग्रामसेवकाचं अपहरण; पत्नीनेच रचला कट

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. (इशशव) कोणतेही व्यसन नसताना एका ग्रामसेवकाला त्यांच्या पत्नीने संगनमत करून चक्क व्यसनमुक्ती केंद्रात डांबून ठेवल्याचा खळबळजनक प्रकार बीड शहरात उघडकीस आला आहे.

केवळ मालमत्ता हडपण्यासाठी आणि आर्थिक वादातून हा कट रचल्याचा आरोप पीडित पतीने केला असून, याप्रकरणी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारीआणि मानवी हक्क आयोगाकडे धाव घेत




न्यायाची मागणी केली आहे.

तक्रारदार हे पेशाने ग्रामसेवक आहेत. ते आपल्या घरी असताना चार अनोळखी व्यक्ती तिथे आल्या. तुम्हाला शिवाजी नगर पोलीस ठाण्यात बोलावले आहे, असे खोटे सांगून त्यांनी यांना बळजबरीने गाडीत टाकले. मात्र, त्यांना पोलीस ठाण्याऐवजी एका खासगी व्यसनमुक्ती केंद्रात नेण्यात आले आणि तिथल्या तिसऱ्या मजल्यावर कोंडून ठेवले. पीडित व्यक्ती घरी न परतल्याने त्यांच्या भावांनी आणि नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली. सुरुवातीला पत्नीने ते प्रशिक्षणासाठी बाहेरगावी गेल्याचे सांगून सर्वांची दिशाभूल केली. मात्र, सत्य बाहेर आल्यावर पत्नीचे खरे रूप समोर आले.

पगार खाते संयुक्त करा आणि घर माझ्या नावावर करा, तरच तुमची केंद्रातून सुटका होईल, अशी धक्कादायक अट तिने पतीसमोर ठेवली. यावरून हा सर्व प्रकार पूर्वनियोजित कट असल्याचे स्पष्ट होत आहे. अखेर पीडिताच्या भावांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे धाव घेतली. प्राधिकरणाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे पीडित ग्रामसेवक व्यक्तीची त्या केंद्रातून सुटका झाली. सुटका करण्यापूर्वी संबंधित केंद्राने त्यांच्याकडून बळजबरीने १६,४०० रुपये फी म्हणून वसूल केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या संपूर्ण प्रकारामुळे आपले शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान झाले असून, केंद्राचे संचालक आणि पत्नीवर कठोर कारवाई करण्याची मागणी पीडिताने दिलेल्या लेखी तक्रारीत केली आहे. या प्रकरणावर सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे ▶ उर्वरित पान २ वर

# टाकळशिंग येथे आ. सुरेश धस यांची प्रगतशील शेतकरी सभापती बद्रीनाथ जगताप शेतीची सखोल पाहणी; दूध उत्पादकांना दिले मोलाचे मार्गदर्शन

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांनी टाकळशिंग येथे भेट देत गावातील प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी व दूध उत्पादकांची सविस्तर बैठक घेऊन आधुनिक शेती, दुग्धव्यवसाय आणि पूरक उद्योगांबाबत मार्गदर्शन केले. यावेळी आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांच्या २० एकर क्षेत्रावरील मक्याच्या पिकासह द्राक्षे, डाळींब, आंबा या फळबागे सोबत टाकळशिंग गावातील इतर शेतकऱ्यांच्या मक्याच्या पिकांची पाहणी करण्यात आली.पिकांची वाढ, खत ▶ उर्वरित पान २ वर



# जीएसटी अधिकाऱ्याची आत्महत्या; गुन्हा नोंद होईना

**बीड । प्रतिनिधी**

जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांनी आत्महत्या केली. त्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावे चिठ्ठी लिहून ही आत्महत्या केल्याने तातडीने गुन्हा नोंद होणे अपेक्षित होते, मात्र पाच दिवसानंतरही या प्रकरणात गुन्हा नोंद झालेला नाही.

बीड येथील जीएसटी अधिकारी सचिन जाधवर यांनी कपीलधार परिसरात आत्महत्या केली होती. यात त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून छळ होत असल्याने आत्महत्या करत असल्याचा उल्लेख असलेली चिठ्ठी लिहून ठेवली होती. हा महत्वाचा पुरावा असूनही पोलिसांनी मात्र अद्यापही जाधवर कुटुंबाची तक्रार घेतली नसून आधी चौकशी करून आणि मगच गुन्हा नोंद करु अशी भूमीका पोलिसांनी घेतली आहे. यातून ▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात शिवारात कापूस वेचताना बिबट्याचा महिलेवर हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील रूपूर शिवारातील गट क्रमांक २५ मध्ये मंगळवारी (दि. २१) दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास बिबट्याने एका महिलेवर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. विठाबाई शिवराम नेटके



(वय ५५) असे जखमी महिलेचे नाव असून, त्या स्वतःच्या शेतात कापूस वेचण्याचे काम करत होत्या. त्यावेळी अचानक बिबट्याने त्यांच्यावर झडप घालून हल्ला केला. या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. बचावासाठी त्यांनी आरडाओरड करत प्रतिकार केला. त्यावेळी पुढे-मागे हालचाल होत असताना बिबट्याने डरकाळी फोडत घटनास्थळावरून पळ काढला. महिलेच्या चेहऱ्यावर स्कार्फ बांधलेला असल्यामुळे मोठी इजा टळल्याचे सांगितले जात आहे. जखमी महिलेला तत्काळ शिरूर ▶ उर्वरित पान २ वर

# 'जेवायला चल' म्हणाला, हात-पाय बांधले अन्..! 5 दिवसांपासून बेपत्ता असलेल्या उसतोड मजुरासोबत....



**बीड । प्रतिनिधी**

पोटाची खळगी भरण्यासाठी शेकडो मैल दूर आलेल्या एका कष्टकरी ऊसतोड मजुराचा अत्यंत क्रूरपणे अंत करण्यात आल्याची धक्कादायक घटना साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यात उघडकीस आली आहे. बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील मच्छिंद्र अंबादास भोसले (४२) यांची स्थानिक संशयित अजय माने याने निर्घृण हत्या केली. या घटनेमुळे ऊसतोड मजुरांमध्ये संतापाची लाट उसळली असून जरंडेश्वर कारखाना परिसरात तणावाचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मच्छिंद्र भोसले हे जरंडेश्वर शुगर मिलमध्ये ऊसतोडणीचे काम करत होते. संशयित आरोपी अजय माने याने 'जेवायला चल' असे म्हणून मच्छिंद्र यांना विश्वासाने सोबत नेले. मात्र, त्यांना जेवण देण्याऐवजी त्याने स्वतःच्या शेतात नेऊन त्यांचे हात-पाय बांधले आणि डोक्यात दगड घालून त्यांची हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह उसाच्या फडात फेकून दिला. १७ जानेवारीपासून बेपत्ता असलेल्या मच्छिंद्र यांचा मृतदेह पाच दिवसांनंतर कुजलेल्या अवस्थेत आढळला.गुन्हा उघडकीस येत असल्याचे लक्षात येताच आरोपी अजय मान ▶ उर्वरित पान २ वर

# अंगाचे कणाकणात तिरंगा, 'तिरंगे'चा अपमान झाला नाही

## नाहक बदनामी करणारे विरुद्ध पोलीसाची कारवाई, वक्फ चेअरमन समीर काजी यांचा खुलासा

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसापासून बीड शहरातील नागरिक असणारे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काजी यांचे बाबत फेसबुक, सोशल मीडिया आणि वर्तमानपत्रात आलेल्या बातमी प्रकरणात त्यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी खुलासा केला आहे की तिरंगा हे आपली ओळख आणि शान



आहे अंगाचे कंकणात तिरंगा आहे तिरंग्याचे अपमान आमच्याकडून झाला नाही आणि आम्ही कुणाल कडून होऊ देणार सुद्धा नाही नाहक बदनामी करून आम्हाला वेठीस धरण्याचे काम केले जात होते त्या इस्माविरुद्ध पोलीसांनी कारवाई करत एन सी दाखल केली होती ज्याला एक लाख रुपयाचे बॉण्डवर जामीन देऊन पोलीस ठाण्यात हजेरी लावण्यात आली आहे. नाहक बदनामी करणाऱ्या विरुद्ध अवमान याचिका दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

काय म्हणतो कायदा?

२००२ नुसार तिरंग्याचा जाणीवपूर्वक अपमान, अवहेलना, जाळणे, पायदळी तुडवणे, किंवा हेतुपुरस्सर चुकीचा वापर केल्यास गुन्हा होतो.

नजरचूक (चुकून) काय?

वाऱ्यामुळे तिरंगा फाटला. दोरी सुटून टेरेसवर पडला. पावसामुळे खराब झाला. लक्षात न आल्यामुळे काही वेळ तसेच राहिला. यात जाणीवपूर्वक अपमानाचा हेतू नसतो, त्यामुळे गुन्हा ठरत नाही.

संविधानिक पदावर काय परिणाम? फक्त तिरंगा फाटला/पडला म्हणून पद जाणार नाही

पद जाण्यासाठी: गुन्हा सिद्ध होणे. जाणीवपूर्वक अपमान सिद्ध होणे. कोर्टचा दोषी ठरवणारा निकाल लागतो. नजरचूक प्रकरणात हे होत नाही.

मात्र काय काळजी घ्यावी?

संविधानिक पदावर असल्यामुळे: तिरंगा पडलेला दिसताच ताबडतोब सन्मानपूर्वक काढून घ्या. फाटलेला असेल तर Flag Code of India नुसार योग्य ▶ उर्वरित पान २ वर



# नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता. नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती. स्त्री–सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री–मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता. नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अध:पतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**

## उगाच श्रीमंत झालो



जॅकी श्रॉफ त्यांच्या आई बाबतीत नेहमीच हळहळ व्यक्त करतात. ते म्हणतात , आम्ही गरीब होतो तेंव्हा चाळीच्या एका खोलीत संपूर्ण कुटुंब सामावून जायचे. रात्री झोपेत कुणाला खोकला लागला तरी ,आई उठायची आणि छातीला बाम लावायची.

कालांतराने श्रीमंती आली , मोठं घर घेतले आणि प्रत्येकासाठी वेगवेगळ्या रूम घेतल्या गेल्या.

एका रात्री ,आईला अचानक हृदयवीकाराचा झटका आला , ती तड्फडली अन ओरडली पण मोठ्या घराच्या मोठ्या भींतीने एक वेगळीच भिंत तयार करून ठेवली आणि आमची आई नजरे आड झाली.

कधी कधी वाटतं, उगाच झालो श्रीमंत आणि ह्याच श्रीमंती मुळे आई गेली.

मित्रांनो अन मैत्रिणींनो , आपल्या माणसाच्या म्हणजेच त्यातल्या त्यात उतार वयातील आपल्या आई –वडिलांसोबत रहा. लहानपणी तुमची पाळण्यात नुसती हालचाल झाली तरी उठून बसणाऱ्या पालकांना जेंव्हा तुमची गरज असेल तेंव्हा तुम्ही नसाल तर त्याहून मोठे दुर्भाग्य कुठले नसेल. त्यांनी तुमच्यासाठी जेवढे केले आहे , त्याच्या १०% जरी तुम्ही केले तरी खुप आहे पण त्यांची साथ सोडू नका....

**(ॲक्टर–मॉडेल जॅकी श्रॉफ यांचे मनोगत.)**

◆ पान १ वरून पुढे...

## आधी एकमेकांच्या....

कारभारावर सडकून टीका केली होती. मात्र, आता सत्तास्थापनेसाठी मनसे शिंदे सेनेच्या मांडीला मांडी लावून बसल्याने सामान्य मतदारांना धक्का बसला आहे. मात्र, या निर्णयाचे मनसेचे नेते राजू पाटील यांच्याकडून समर्थन करण्यात आले.

अंबरनाथ नगरपालिकेत कुरघोडीचे राजकारण होताना दिसले होते. ते आम्हाला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत होऊन द्यायचे नव्हते. एक बाजू स्थिर असली पाहिजे. अन्यथा वारंवार नगरसेवकांची पळवापळवी झाली असती. आमच्या पाठिंब्यामुळे या सगळ्याला पुढील पाच वर्षांसाठी १०० टक्के आळा बसला. कल्याण डोंबिवलीत आमचे पाच नगरसेवक वेगवेगळ्या पॅनलमधून निवडून आले आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिका कर्जात आहे. त्यामुळे आमच्या नगरसेवकांना प्रभागात विकास करण्यासाठी निधी मिळाला नसता. नगरसेवकांच्या म्हणण्यानुसार सत्तेला चिकटलो तर नगरविकास खात्याकडून काहीतरी निधी मिळेल. हा सर्वांगीण विचार करुन ज्या लोकांनी मनसेला मोठ्या अपेक्षने मतदान केले आहे, त्यांची काम होण्यासाठी आम्ही शिंदे सेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला, असे राजू पाटील यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हाच राज ठाकरे यांनी आम्हाला तिकीट वाटपापासून पुढील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार दिले होते. ठाकरे गटाचे जे दोन नगरसेवक मनसेत आले आहेत, त्यापैकी विनोद केणे हे मनसे विद्यार्थी सेनेचे शहर अध्यक्ष आहेत. तर राहुल कोटा हे मनसेचे विभाग अध्यक्ष आहेत. जागावाटपात गोंधळ नको म्हणून या दोघांनी वेगळ्या चिन्हावर निवडणूक लढवली होती. ते आमच्यासोबत आहेत, आम्ही त्यांना अपात्र ठरु देणार नाही, असे राजू पाटील यांनी सांगितले.

## शिवसेना कोणाची....

येणार होता. मात्र आज सॉलिसिटर जनरल यांना दुसऱ्या एका प्रकरणात

◆ पान १ वरून पुढे...

सुनावण्यासाठी जावे लागणार असल्यामुळे त्यांनी वेळ वाढवून मागितला. त्यावर कोर्टाने दोन्ही पक्षकारांची मते जाणून घेतली आणि शुक्रवारी २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुनावणी घेण्याचे ठरले आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेला शिवसेना पक्ष आणि त्यांचे धनुष्यबाण चिन्ह निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले आहे. विधिमंडळातील त्यांच्या आमदारांच्या संख्येच्या आधारे आयोगाने त्यांना पक्ष आणि चिन्ह बहाल केले. हाच निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कायम ठेवत विधिमंडळातही शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निवाडा दिला. निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. साधारण साडेतीन वर्षांपासून हा खटला सुरु आहे. दरम्यानच्या काळात लोकसभा निवडणूक झाली. २०१९ च्या विधानसभेचा कार्यकाळ संपला, त्यामुळे शिंदेंसह त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांवरील अपात्रतेचा खटला निवाड्याविनाच राहिला. मात्र शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे कोणाचे या खटल्याला फक्त तारखा मिळत आहेत. दरम्यानच्या काळात सर्वोच्च न्यायालयात चार सरन्यायाधीश येऊन गेले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या पीठासमोर हा खटला आहे. त्यांचा एक वर्षाचा कार्यकाळ आहे. तर यंदाचे वर्ष हे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या जयंतीदिनी खटल्याच्या सुनावणीला सुरुवात होऊन याच वर्षात हा निकाल लागेल अशी आपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## धक्कादायक! बीडमध्ये...

यांनी संताप व्यक्त केला. विधी सेवा प्राधिकरणाने यावर अहवाल मागवला असल्याचे सांगितले. चौकशीअंती दोषींवर कडक कारवाई होणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुसरीकडे, व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक तेजस घुमरे यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. पत्नीने रीतसर शपथपत्र आणि पुरावे दिले होते, त्या आधारेच प्रवेश दिला होता. तक्रारीत काहीही तथ्य नाही, असा दावा त्यांनी केला आहे.या घटनेमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## टाकळशिंग येथे....

व्यवस्थापन, पाणी नियोजन व उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पन्न कसे मिळवता येईल, यावर आमदार धस यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.दूध उत्पादकांसाठी आयोजित बैठकीत गाईला ओला व वाळा चारा किती प्रमाणात द्यावा, चाऱ्याचे संतुलन कसे ठेवावे, तसेच मुरगास तयार करण्यासाठी बेलिंग मशीन, हार्वेस्टर मशीन आपल्या भागासाठी उपलब्ध करणार आहेत.शास्त्रीय पद्धत, साठवण व वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. योग्य आहारामुळे दूध उत्पादनात कशी वाढ होते, याचे प्रत्यक्ष उदाहरण देत आमदार धस यांनी मार्गदर्शन केले. तसेच दूध व्यवसाय अधिक फायदेशीर व शाश्वत कसा करता येईल, गाईंची योग्य निवड, गाई लागवड (ब्रिडिंग), आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण व स्वच्छतेचे महत्त्व यावरही त्यांनी भर दिला. मुक्त संचार गोठ्यांचे फायदे सांगत अशा पद्धतीने गोठे उभारल्यास गाईंचे आरोग्य सुधारते व उत्पादन वाढते, असे त्यांनी नमूद केले. यासोबतच शेततळे, जलव्यवस्थापन, तसेच शेतीला पूरक उत्पन्न देणाऱ्या द्राक्षे, डाळिंब व आंबा फळबाग या फळ बागेचे आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर शेती व दुग्धव्यवसायातून शेतकऱ्यांना निश्चितच समृद्धी साधता येईल असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला. या पाहणी दरम्यान शेतकरी, दूध उत्पादक, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जीएसटी अधिकाऱ्याची...

जीएसटी अधिकाऱ्याला सोयीस्कर वेळ दिला जात असून प्रकरण मॅनेज करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या प्रकरणात अधिकाऱ्याला नोटीस दिली आहे. सीडीआर तपासले जाणार आहेत, कार्यालयातील इतर सहकाऱ्यांचे जबाब घेतले जाणार आहेत, संबंधित बाहेरच्या लोकांची चौकशी केली जाणार आहे. पूर्ण खात्री झाल्यावर, पुरावे जमा झाल्यावर गुन्हा नोंदवला जाईल, असे सांगितले जाते

◆ पान १ वरून पुढे...

## बीड जिल्ह्यात...

कासार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना दूरध्वनीवरून कळविले आहे. परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## 'जेवायला चल..

' याने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. सध्या त्याच्यावर रुग्णालयात पोलीस पहाऱ्यात उपचार सुरू आहेत. त्याने इतक्या क्रूरपणे हत्या का केली? याचे कारण अद्याप गुलदस्त्यात असून तो शुद्धीत आल्यावरच हत्येचे गुपित उलगडणार आहे. या घटनेची माहिती मिळताच बीड जिल्ह्यातील मजूर संघटनांनी कारखान्यासमोर ठिय्या मांडला आहे. दिवसभर घाम गाळून साखर गोड करणाऱ्या मजुराचे रक्त सांडले जात असेल, तर आम्ही सुरक्षित कुठे? असा संतप्त सवाल मजूर विचारत आहेत. पीडित कुटुंबाला न्याय आणि आरोपीला फाशीची शिक्षा मिळावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## अंगाचे कणाकणात...

पद्धतीने नष्ट करा. सोशल मीडियावर फोटो/व्हिडिओ फिरू नयेत याची दक्षता घ्या. निष्कर्ष: नजरचूक = पद सुरक्षित. जाणीवपूर्वक अपमान = कायदेशीर कारवाई + पदाचा धोका. ही बाब विसरता कामा नये की शासनाच्या वतीने हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात आली होती आणि या उद्देशाने प्रत्येकाने आपल्या घरावर तिरंगा फडकविण्याचे काम केले होते नजर चुकीने झालेली घटनेला उपयोगात आणून षड्यंत केले जात असेल तर हे अत्यंत दुर्दैव बाब म्हणावी लागेल कारण की कोणताही भारतीय नागरिक अशी घटना होऊ देणार नाही आणि समीर काझी हे जबाबदार पदावर नियुक्त असून याबाबत शंका निर्माण करणे चुकीचे ठरल्याशिवाय राहणार नाही.

◆ पान ४ वरून पुढे...

## वै.किसनबाबांच्या...

आहे. पवित्र ती भूमी पावन तो देश तेथे हरीचे दास जन्म घेती याप्रमाणे या पुण्यभूमीत वै.किसनबाबा आणि नवनाथबाबा यांच्या पुण्याईने दिवसेंदिवस या ठिकाणचे महत्त्व आणि महात्म्य वाढू लागले असून लाखो भाविकांची उपस्थिती हेच एक उदाहरण आहे. जिल्ह्याच्या कानाकोपर्यातून इथे लाखो भाविक येऊ लागले आहेत. मनोभावे सेवा करणार्या भक्ताला गोरक्षनाथाचा आशीर्वाद मिळतो. जात–पात बाजूला काढून वारकरी सांप्रदायाने हा समाज एकत्र ठेवण्याचा प्रयत्न केला असून महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्याचे काम प्रत्येकाने करायला हवे. गोरक्षनाथ टेकडीचा विकास सर्वांच्या सहकार्याने झाला असून यामध्ये आपण खारीचा वाटा उचलल्याचे समाधान होत आहे. यावेळी ह.भ.प.अक्रूर महाराज यांनीही माजी मंत्री क्षीरसागर यांनी गोरक्षनाथगडावर केलेल्या योगदानाचा उल्लेख करत धार्मिक क्षेत्रात जयदत्त अण्णांवर प्रेम करणारी मंडळी खूप आहे. कारण बीड जिल्ह्यातील अनेक धार्मिक क्षेत्राला त्यांचे सहकार्य असते असे ते म्हणाले. यावेळी शिवाजीराव फड, ॲड.विष्णूपंत काळे, गोरख दन्ने, नारायण माने, अरुण लांडे, संदीप डावकर, बालाप्रसाद जाजू, तुषार घुमरे, राजाभाऊ घुमरे, भाऊ सुरवसे, उद्धव म्हेत्रे, नारायण देवकते, ओमप्रकाश खवतड, बंडू घुमरे, भगीरथ बांडे, नवनाथ घोडके, बंडू लांडे, राम भोगे, नागेश शिंदे यांच्यासह परिसरातील भाविक–भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाधर घुमरे यांनी केले.

## अंबाजोगाईकरांना दिलासा...

पदभार स्वीकारल्यानंतर नंदकिशोर मुंदडा यांनी सर्वात आधी पाणीपुरवठा विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. यावेळी त्यांनी पाणीपुरवठा आणि वितरण प्रणालीमधील तांत्रिक अडचणी, गळती आणि वितरणातील नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला. यातील त्रुटी दूर करून योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. प्रशासनाने केलेल्या या नवीन नियोजनानुसार आता शहरात सहा दिवसांआड पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

पाणीपुरवठ्याबाबत अधिक माहिती देताना मुंदडा यांनी स्पष्ट केले की, सध्या सहा दिवसांआड पाणी दिले जात असून भविष्यात हा कालावधी आणखी कमी करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तांत्रिक अडचणीमुळे केवळ चोबारा भागात सध्या सात दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे, मात्र तिथली अडचणही लवकरच मार्गी लावली जाईल. वीजपुरवठ्यात काही मोठे तांत्रिक अडथळे आले तरच पाणीपुरवठ्याला एखाद्या दिवसाचा विलंब होऊ शकतो, अन्यथा नियमित पुरवठा सुरू राहील असे त्यांनी नमूद केले.

## अंजनडोह येथ...

उपसरपंच श्री प्रकाशन सोळंके यांच्या हस्ते झाले. या शिबिरामध्ये आपल्या शुगर, डायबेटीस, संधीवात व इतर आता समाधान विषयी शंभर पेक्षा अधिक रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. घरत मॅडम, पूजा खाडे, पी. डी. स्वामी, शेख नासेर, महेश सावंत, आर. एल. वाडेकर यांनी तपासणीसाठी सहकार्य केले. या शिबिराविषयी रासेयोजनेच्या स्वयंसेवकांनी नागरिकांना व ग्रामस्थांना मदत केली. शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. शिबिर प्रसंगी सरपंच श्री. प्रमोद सोळंके उपसरपंच श्री. प्रकाश सोळंके ग्रामविकास अधिकारी एस. एस. साखरे यांची उपस्थिती होती.

## इंटरनॅशनल मॅथ...

अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या प्राचार्या मेघा बिर्ला तसेच गणित विषयाच्या शिक्षिका काजल मालपाणी यांच्या मार्गदर्शन व मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात आले.या घवघवीत यशामुळे किशोरी इंग्लिश स्कूलचे शैक्षणिक कार्य, विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता आणि शिक्षकांचे समर्पित योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाले आहे. भविष्यातही आमचे विद्यार्थी अशाच प्रकारे उत्कृष्ट यश संपादन करतील,

◆ पान ४ वरून पुढे...

याची आम्हाला खात्री आहे. –डॉ. अदिती सारडा, संचालिका, किशोरी इंग्लिश स्कूल

## दिगंबरानुचर उपाख्य...

शिवाचार्य महाराज (मठ संस्थान, अंबाजोगाई), गिरधारीलालजी भराडिया (सचिव, योगेश्वरी देवल कमिटी, अंबाजोगाई), बाजीराव धर्माधिकारी (अध्यक्ष, स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्था,परळी वै.), डॉ.बी.आय.खडकभावी (माजी प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई), डॉ.अमृतराव देशपांडे (ज्येष्ठ मार्गदर्शक, दासोपंत संशोधन मंडळ), उध्दवबापु आपेगावकर (आंतरराष्ट्रीय पखवाजवादक), बिपीनदादा क्षिरसागर (जिल्हा कार्यवाह, रा.स्व.संघ, अंबाजोगाई), राहुल देशपांडे (कार्यवाह, संवेदना सेरेब्रल विकासन केंद्र, हरंगुळ, लातुर) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी विष्णुकुमार देशपांडे (मा.संचालक – म.रा.वि.मं.निर्मिती व गद्य लेखक), जितेंद्र देशपांडे (प्रकल्प संपादक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई) आणि सुनिल दीक्षित (उपाध्याय, देवघर, अंबाजोगाई) यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. तरी या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाईचे अध्यक्ष अरूण देशपांडे (हरबाजी), उपाध्यक्ष दासोपंत गोस्वामी, सचिव ॲड. दत्तप्रसाद रांदड, सहसचिव लक्ष्मीकांत गोस्वामी, कोषाध्यक्ष उपेंद्र गोस्वामी, विश्वस्त – दत्तप्रसाद गोस्वामी, कमलाकर देशपांडे, राहुल देशपांडे, जितेंद्र देशपांडे, सौ.दिपाली देशपांडे, सौ.अंजली सेलुकर यांनी केले आहे.

## यशवंत विद्यालयाचे...

स्वर्गीय गोविंदरावजी वाघ यांनी संस्थेसाठी दिलेल्या अमूल्य योगदान व त्याच्या कार्याला उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटक संस्थेच्या संचालक ज्येष्ठ मार्गदर्शक श्रीमती सुधामती वाघ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत यापुढे ही विद्यार्थी गुणवत्ता विकास वाढीसाठी संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन पालकांनी

◆ पान ४ वरून पुढे...

नियमित शाळेशी संपर्क ठेऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत लक्ष ठेवावे असे सांगितले. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे मराठी हिंदी गीत व नृत्य सादर करण्यात आले. कलाकारांनी यामध्ये हिरीरीने भाग घेतला. उद्घाटनपर कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेच्या शिक्षिका श्रीमती गर्जे एस.डी.यांनी केले. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका श्रीमती फुके डी.एन. व श्री गाडेकर के.बी. यांनी तर आभार प्रदर्शन मुळे श्री ए.टी. व श्रीमती कुलकर्णी आर. ए. यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली

## 14 वर्षाच्या मुलीचा...

मुलगी आहे असे सांगितले. सुमारे एक तासानंतर मुलीला झडख पल्लवी जाधव यांच्या समक्ष हजर केले. सदर मुलगी खूप घाबरलेली होती . तिला जवळ घेवून, विश्वासात घेवून तिची विचारपूस केली. व तिचे समुपदेशन केले. त्यांनतर झडख पल्लवी जाधव यांनी गावचे सरपंच व ग्रामसेवक यांना लरश्र करून घटनास्थळी बोलावून घेतले व त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. तसेच त्यांनी तिथे हजर असलेल्या सर्व नातेवाईक मंडळी व गावातील नागरिकांना बालविवाह कायदा व बालविवाहाचे मुलींवर होणाऱ्या दुष्परिणामाबाबत माहिती देवून जनजागृतीपर मार्गदर्शन केले. त्यानंतर सदर पीडित मुलगी व बालविवाह करणारा कृष्णा उर्फ बबन वरबडे तसेच त्याचे आई वडील यांना ताब्यात घेवून, पुढील कारवाई साठी पोस्टे ला हजर केले व मुलीचे आई वडील यांना फोन करून पोस्टे ला हजर राहण्यास सांगितले . ग्रामसेवक यांना बालविवाह झालेबाबत गुन्हा दाखल करण्यास सांगितले. तसेच पोस्टेच्या महिला अंमलदारांना पीडित मुलीला तिच्या आईवडिलांसोबत बालकल्याण समिती समोर हजर करणेबाबत सूचना दिल्या.सदर कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नवनीत कावत सर, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सर, यांच्या मार्गदर्शनाखाली, झडख पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, प्रदीप येवले, अशोक शिंदे , पोशी योगेश निर्धार सर्व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष बीड यांनी केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# प्रशासनिक संवेदनशीलतेचा आदर्श : 21 हजार 511 निराधारांना न्याय

## बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या पुढाकारातून दरमहा प्रस्तावांचा वेगवान निपटारा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील निराधार, वयोवृद्ध, दिव्यांग आणि दुर्धर आजारग्रस्त घटकांसाठी प्रशासनाचा हात खऱ्या अर्थाने आधार बनत असल्याचे चित्र सध्या बीड तहसील कार्यालयात दिसून येत आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेंतर्गत सादर होणाऱ्या प्रस्तावांचा दरमहा वेगवान व पारदर्शक निपटारा बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.



मागील महिन्यात तालुकास्तरीय समितीची सविस्तर बैठक घेण्यात आली असून, त्यामध्ये तब्बल १,०४५ निराधार लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी पात्र ठरविण्यात आले. या पात्र लाभार्थ्यांची अधिकृत यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यांना प्रत्यक्ष लाभ देण्याची कार्यवाही तहसीलस्तरावरून सुरू करण्यात आली आहे. संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत निराधार नागरिकांना दरमहा १,५०० रुपये तर दिव्यांग लाभार्थ्यांना २,५०० रुपये इतके अनुदान दिले जाते. ही रक्कम केवळ आर्थिक मदत नसून, गरजू घटकांच्या जगण्याला दिलेला आधार असल्याची भावना लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव तहसील कार्यालयात सादर केले जातात. त्यानंतर तालुकास्तरीय समितीच्या बैठकीत प्रस्तावांची काटेकोर छाननी करून पात्र लाभार्थ्यांना मंजुरी दिली जाते. पदभार स्वीकारल्यापासून प्रलंबित प्रस्तावांचा बोजा कमी करण्यासाठी आणि कोणताही प्रस्ताव रखडू नये यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दरमहा बैठका घेण्यावर विशेष भर दिला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरमहा शेकडो प्रस्ताव तहसील कार्यालयात दाखल होत असतात. हे सर्व प्रस्ताव वेळेत निकाली काढण्यासाठी दर महिन्याला समितीची बैठक घेण्याचा निर्धार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी व्यक्त केला असून, भविष्यात कोणताही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाही, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. बीड तहसील कार्यालयामार्फत सध्या २१ हजार ५११ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे दरमहा थेट अनुदान जमा करण्यात येत आहे. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेंतर्गत ही प्रक्रिया सातत्याने राबविली जात असून, त्यामुळे निराधार, वृद्ध व गरीब कुटुंबांना नियमित आर्थिक आधार मिळत आहे. या संपूर्ण कार्यपद्धतीला राज्य शासनाच्या धोरणात्मक दिशानिर्देशांचे भक्कम पाठबळ लाभत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सामाजिक न्याय व कल्याणकारी योजनांना गती देण्याच्या भूमिकेनुसार निराधार, वयोवृद्ध व दिव्यांग घटकांपर्यंत शासकीय लाभ वेळेत पोहोचावा, यावर भर दिला जात आहे. त्याच अनुषंगाने पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडून जिल्हास्तरावर सातत्याने आढावा घेण्यात येत असून, योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक ते धोरणात्मक मार्गदर्शन दिले जात आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी नियमित सूचना, आढावा बैठका आणि पाठपुरावा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडून बीड जिल्ह्यात योजनांच्या अंमलबजावणीवर विशेष लक्ष ठेवले जात असून, प्रलंबित प्रकरणे, डीबीटी प्रक्रियेतील अडचणी तसेच लाभार्थ्यांपर्यंत थेट लाभ पोहोचण्याबाबत वेळोवेळी सूचनांचे पालन करण्यात येत आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्याकडून तहसीलस्तरावरील प्रस्तावांची छाननी, समिती बैठका आणि प्रशासकीय समन्वयावर भर दिला जात असून, सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांच्याकडून प्रक्रियात्मक सुलभता, प्रशासकीय नियंत्रण आणि अहवाल प्रणाली मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन केले जात आहे. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या माध्यमातून उपविभागीय स्तरावर योजनांचा आढावा घेऊन तहसील प्रशासनाशी समन्वय साधला जात आहे. वरिष्ठ प्रशासनाच्या या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, नियमित आढावा आणि काटेकोर पाठपुराव्यामुळे बीड तहसील कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या निराधार व सामाजिक सुरक्षा योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याशिवाय तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दिव्यांग, दुर्धर आजारग्रस्त व वयोवृद्ध घटकांतील अनेक लाभार्थ्यांना नव्याने मंजुरी देण्यात आली आहे. कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत ३९ लाभार्थ्यांना प्रत्येकी २० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे. निराधार घटकांना केवळ अर्ज सादर करण्यापुरते न ठेवता, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, प्रक्रियेबाबत मार्गदर्शन आणि नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. दर महिन्याला घेतल्या जाणाऱ्या विशेष बैठकींमुळे योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचत आहे. या कार्यामध्ये तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे, सहाय्यक महसूल अधिकारी हेमलता परचाके, महसूल सहाय्यक वैशाली बहिरवाड तसेच ऑपरेटर महेंद्र राऊत हे अधिकारी व कर्मचारी सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या संवेदनशील व लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे गरजू घटकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. प्रशासन कागदांपुरते न राहता माणसांच्या आयुष्याशी जोडले गेले, तर त्यातूनच खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची अनुभूती निर्माण होते – बीड तहसील कार्यालयातील ही कार्यपद्धती त्याचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

---

## राज्यस्तरीय स्पर्धेत रमेश जाडकर राज्यातून द्वितीय

**चौसाळा । प्रतिनिधी**



शिक्षणातील गुणवत्ता संवर्धनासाठी व शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी, शिक्षकांचा व्यावसायिक विकासाला प्रोत्साहन देऊन त्यांच्या कार्याची ओळख निर्माण करून देण्यासाठी यावर्षीपासून राज्यातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण पुणे यांनी एकूण ४३ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन या वर्षात केलेले आहे. यातीलच राज्यस्तरीय निमेशन सादरीकरण स्पर्धा दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक विद्या प्राधिकरण पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. राज्यातून प्रत्येक विभागातून आलेले स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) ता. बीडच्या कानडीघाट हायस्कूल, कानडीघाट ता. जि. बीड या शाळेचे गणित विषय शिक्षक रमेश जाडकर सर यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी संपूर्ण राज्यातील विविध जिल्ह्यातून स्पर्धक मोठ्या संख्येने आलेले होते. या स्पर्धेत नवगण शिक्षण संस्था राजुरी (न.) जिल्हा बीडच्या कानडी घाट हायस्कूल, कानडी घाट ता. जि. बीड या शाळेचे गणित विषय शिक्षक रमेश जाडकर यांच्या कामगिरी करिता नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. दिपाताई क्षीरसागर, तसेच संस्थेचे प्रशासक डॉ. व्हि. टी. देशमाने व डॉ. श्री गुट्टे तसेच कानडीघाट हायस्कूलचे मुख्याध्यापक एम. एन. कसबे, चौसाळा बीटच्या जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर, चौसाळा केंद्राचे केंद्रप्रमुख तुकाराम सपाटे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद व कर्मचारी तसेच मित्र परिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---

### आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात

## ग्राममहसूल अधिकारी, मंडळ अधिकारी एकवटले

### हुकमी तहसीलदाराच्या बदली घ्या मागणीसाठी ग्राममहसूल अधिकारी मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांच्या हुकुमशाही व दडपशाही कारभारामुळे आष्टी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सततच्या जाचाला कंटाळले असून तहसिलदार पाटील यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी प्रवीण शिंदे यांची बदली करून योग्य कार्यवाही होणार नाही तोपर्यंत सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी सामुहिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे.उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दि.२० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद आहे.की तहसिलदार पाटील हे सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळअधिकारी यांना खालच्या पातळीची वागणूक देत आहे. प्रत्येक कामात दमदाटी करून अर्च भाषेत बोलतात त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यामध्ये दहशतीने भितीचे वातावरण पसरले आहे. आठवड्यामध्ये कमीत कमी पाच दिवस बैठका घेतात त्यामुळे लोकांचे काम होत नाही. त्यांच्या मर्जीतले काही मोजके लोक सोडता प्रत्येकाला टार्गेट करून खालच्या पातळीने बोलतात तसेच बैठकीमध्ये मानसिक खच्चीकरण करून सर्वासमोर हिन दर्जाची वागणूक दिली जाते. दिनांक १६ जानेवारी रोजी आष्टी तहसिल कार्यालयात ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी तालुका कार्यकारणीची निवड होती त्याअनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी कामकाज करत असताना येणाऱ्या अडचणी बाबत चर्चा झाली. त्यावरून तहसिलदार वैशाली पाटील यांना प्रचंड राग आला असून त्यामुळे प्रत्येकावर पूर्वग्रहदूषित भावनेने व जाणून बुजून त्रास देण्याची मानसिकता आम्हाला दिसून येत आहे व ते सत्य आहे.दिनांक १७ जानेवारी रोजी सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची बैठक सकाळी ११ वाजता बोलावण्यात आली होती. त्यामधे प्रवीण शिंदे ग्राम महसूल अधिकारी यांनी अध्यक्ष निवडीवरून बैठकीमध्ये महिला कर्मचारी यांच्या समोर अर्वाच्य व गलिच्छ भाषामध्ये अरेरावी केली. यावेळी स्वतः तहसिलदार आष्टी ह्या उपस्थित होत्या संबंधितास कोणत्याही प्रकारची समज न देता प्रोत्साहन दिले. त्यानंतर दिनांक १९ रोजी परत सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची परत नेहमी प्रमाणे बैठक बोलावण्यात आली. तहसीलदार व नायब तहसिलदार यांचे समक्ष बैठक सुरु झाल्यानंतर प्रवीण शिंदे ग्राम महसूल अधिकारी यांनी बाहेरचे गुंड प्रवृत्तीचे दोन व्यक्ती सोबत आणून बैठकीमध्ये सुरुवातीला धुमाकूळ घालून अर्वाच्य भाषेत शिविगाळ सुरु केले त्यानंतर अध्यक्ष ग्राम महसूल अधिकारी अशोक सुरवसे व ग्राम महसूल अधिकारी गव्हाणे साहेब यांनी त्यांना समज देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी बैठक सुरु असतांना गुंड प्रवृत्तीच्या लोकांना बोलावून समज देण्याऱ्या दोघांनाही ठोकून काढा असे तहसिलदार समक्ष सांगितले व बैठक हॉलच्या बाहेर बोलावून दमदाटी केली. हे सर्व तहसिल आष्टी यांचे समोर घडूनही तहसिलदार यांनी शिंदे यांची बाजू घेवून नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, व ग्राम महसूल अधिकारी यांना दमदाटी करण्यास सुरुवात केली.

माझी कुठे तक्रार करायची करा कलेक्टरकडे जा अथवा मंत्र्याकडे जा माझं कोण काही करू शकत नाही मी सर्व ठिकाणी फिरून आले आहे मला काही फरक पडत नाही. नौकरी सोडून द्या, नौकरी करण्याच्या लायकीचे तुम्ही नाही, तुम्ही जनावरांसारखे आहात

---

## जयभवानी महाविद्यालयात इस्त्राईल येथिल शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांचे व्याख्यान

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या प्रेरणेने विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर इन बायोटेक्नॉलॉजी फिल्ड या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यशाळेत इस्त्राईल येथिल शास्त्रज्ञ डॉ.सचिन घरत यांचे महाविद्यालयात सकाळी ठिक.१०:००वा. मार्गदर्शन लाभणार आहे.तरी पाटोदा तालुक्यातील विज्ञान शाखेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा !असे संयोजन समितीच्या वत्तीने कळविण्यात आले आहे.या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर तर अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित राहाणार आहेत.तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा!असे संयोजन समितीच्या वत्तीने अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे व वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.बाळासाहेब जोशी यांनी कळविले आहे.

---

## सौ. के.एस.के. महाविद्यालयात बोलींचा जागर गोरमाटी बोली विशेष कार्यक्रम विविध उपक्रमाने संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय महाराष्ट्र राज्य आणि मराठी विभाग सौ. के. एस.के. महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त बोलींचा जागर अंतर्गत गोरमाटी बोली या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बोलींचा जागर या कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडी शोभा यात्रा काढून करण्यात आली. या शोभायात्रेत बंजारा समाज बांधव महिला भगिनी यांनी बंजारा वेशभुषा, नृत्य, लोकगीते यामधून बोलीमधील लोककलांचे सादरीकरण केले. या ग्रंथदिंडीचे व कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिध्द लेखिका तथा सहसचिव नवगण शिक्षण संस्था डॉ. दीपा क्षीरसागर यांच्या उपस्थित करण्यात आले. ग्रंथदिंडी महाविद्यालय ते माने कॉम्प्लेक्स तेथुन पोलीस अधिक्षक कार्यालया मार्गे शिवाजी नगर पोलीस ठाणे ते सौ. के.एस.के. महाविद्यालयात दाखल झाली. मुख्य सभागृहात स्व. काकु नाना, संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन पुजन करण्यात आले. याप्रसंगी श्री अरुण गिते भाषा संचालक महाराष्ट्र राज्य, श्री. शरद यादव सहाय्यक भाषा संचालक, श्री. आनंद गांगन अनुवादक, श्री महेश लगड अनुवादक, श्री अनुराग डोईजड, श्री. दिलीप लादे यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द कवी तथा बोली अभ्यासक श्री. अरुण पवार, बोलीभाषा तज्ज्ञ श्री. सुधाकर जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर उपस्थित होते. उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. दीपा क्षीरसागर यांनी गोरमाटी बोलीभाषा संस्कृती टिकवण्यासाठी विविध बोलींचा जागर व या बोलींन मधून साहित्याची निर्मिती झाली पाहिजे.

---

## 'आमच्याकडे काहीच नाही; सगळं कागदावरच!'

### जिल्हा परिषद शाळेतील चिमुकलीने थेट अजित पवारांना लिहिलं हृदयद्रावक पत्र

### पालकमंत्री 'लाडक्या भाचीला' न्याय देणार का? : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील परभणी केसापुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या अंकिता कवचट या चिमुकल्या विद्यार्थिनीने थेट राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना लिहिलेलं पत्र सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. शाळेतील मूलभूत सुविधांचा अभाव, कागदोपत्री खर्च आणि प्रत्यक्ष वास्तव यातील तफावत तिने अतिशय धाडसाने या पत्रातून मांडली आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलभुत असुविधा आणि शाळेच्या दुरावस्था याविषयी वारंवार आंदोलने करून पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष वेधले आहे.आता या चिमुकल्या मुलीचा आर्त टाहो दादा ऐकतील काय? आणि बीड जिल्ह्यातील शाळेची दुरावस्था संपुष्टात येईल का हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली असून प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

---

# जिल्हा परिषद;पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक;प्रतिबंधात्मक आदेश जारी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून निवडणूक प्रक्रिया सुरु झाली आहे. दि.५फेब्रुवारी रोजी मतदान तर दि.७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी मनाई आदेश जारी केले आहेत.

मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश– दि.३ ते ५ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया संपेपर्यंत निवडणूक कामासाठी नियुक्त कर्मचारी व्यतिरिक्त पाच किंवा जास्त लोक एकत्र येणे, मतदान केंद्राच्या १०० मिटर परिसरात मोबाईल, कार्डलेस फोन, लाऊड स्पिकर, मेगा फोन, मायक्रोफोन, वायरलेस सेट आदी वापरण्यास मनाई केली आहे. तसेच मतदानाच्या गोपनीयतेचा भंग होईल असे वर्तन करणे, मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधी, अन्य प्रतिनिधी यांनी मोबाईल वापरने, फोटो काढणे, चित्रीकरण करणे, परवानगी दिलेल्या वाहनांखेरीज वाहनांचा वापर करणे,मतदारांची ने आण करणे. १०० मिटर परिसरात निवडणूक विषयक प्रचार करणे, मतदारांना धमकावणे, मतदारांवर दबाव टाकणे, ज्वलनशील, स्फोटक पदार्थ वस्तूची ने आण करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या आदेशाचा भंग केल्यास संबंधित व्यक्ती कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहिल.

मतमोजणी केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश– जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही व्यक्तीस (निवडणूक आयोगाने परवानगी दिलेल्या व नियुक्त अधिकारी व्यक्तिरिक्त) प्रवेश करण्यास, मोबाईल नेण्यास, वाहन नेण्यास दि.७ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ते मतमोजणी संपेपर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे.

शस्त्र वापरण्यास प्रतिबंध– निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भयपणे पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शस्त्र परवाना देणेशस्त्र परवानाधारकांना जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात शस्त्र सोबत घेऊन फिरण्यास मनाई करण्यात आली आहे.

शासकीय कार्यालये, विश्रामगृहांचा वापर करण्यास मनाई– निवडणूक प्रक्रिया पार पडेपर्यंत जिल्ह्यातील शासकीय इमारती, त्यांचे आवार, शासकीय विश्रामगृहे यांचा राजकीय कामांसाठी वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे, होर्डिंग बॅनर लावणे, प्रचाराचा मजकूर लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

परवानगीशिवाय वाहनांवर राजकीय पक्षाचे झेंडे, बोधचिन्ह लावण्यास मनाई– निवडणूक कालावधीत सक्षम प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय टोरिक्षा, टेम्पो, सायकल व अन्य वाहनांवर पक्षाचे झेंडे, बोधचिन्ह व अन्य घोषवाक्य लिहिण्यास मनाई करण्यात आली आहे.

पुर्वपरवानगी शिवाय प्रचार साहित्य लावण्यास मनाई– निवडणूक प्रचारासाठीचे प्रचार साहित्य हे कोणत्याही व्यक्तिगत जागा, इमारत, भिंत, आवार येथे संबंधित मालकाच्या परवानगीशिवाय्व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

मुद्रणालय मालकांना निर्बंध– निवडणूक आचारसंहिता भंग होऊ नये यासाठी राजकीय पक्ष, उमेदवार यांनी त्यांच्या प्रतिनिधीनी मुद्रणालय मालक, प्रकाशकांना उमेदवराचे नाव व त्यांना नेमून दिलेले चिन्ह छापणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारात नमुना मतपत्रिका छापणे असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

ध्वनिक्षेपकाच्या वापरावर निर्बंध– राजकीय पक्ष, उमेदवार यांना ध्वनिक्षेपकाचा वापर परवानगी शिवाय करता येणार नाही. तसेच सकाळी ६पूर्वी व रात्री १० नंतर कोणत्याही क्षेत्रात व फिरत्या वाहनांवर वापर करता येणार नाही. कोणत्याही ठिकाणी ध्वनिक्षेपक वापराआधी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून पूर्वपरवानगी घ्यावी,असे निर्बंध घालण्यात आले आहेत.

रहदारीस अडथळा करण्यास निर्बंध– निवडणूक प्रचारादरम्यान राजकीय पक्ष, उमेदवार आदी यांना निवडणूक प्रचाराचे साहित्य रहदारी अडथळा होईल किंवा अपघाथोतील अशा पद्धतीने लावण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

हे सर्व आदेश निवडणुक कालावधी पुरता लागू राहतील असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • गुरूवार, दि. २२ जानेवारी २०२६ •

# वै.किसनबाबांच्या पवित्र वास्तव्याने पावन झालेल्या गोरक्षनाथगडावर लाखो भाविकांची उपस्थिती

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर धर्मनाथ बीज निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते. ते म्हणाले की, वै.किसन बाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोरक्षनाथगडावर लाखोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती दिसू लागली आहे.



मंगळवार वै.ह.भ.प. किसनबाबा महाराज यांच्या आशीर्वादाने व मठाधिपती नवनाथ बाबा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मनाथ बीज निमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्री क्षेत्र गोरक्षनाथगडावर आयोजित करण्यात आला होता. मंगळवार दि.२०रोजी ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन होते. याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प.अखंडानंद गिरी महाराज, माजी आमदार बदामराव पंडित, मराठा समाजाचे नेते मनोजदादा जरांगे पाटील, डॉ.योगेश क्षीरसागर, गंगाधर घुमरे, अरुण डाके, जगदीश काळे, विलास बडगे, गणपत डोईफोडे, ॲड.राजेंद्र राऊत, राजेंद्र मस्के, कुंडलिक खांडे, गंगाधर काळकुटे, परमेश्वर सातपुते, ज्ञानदेव काशिद, ऋषिकेश बेदरे, हरिदास जोगदंड, सखाराम मस्के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, धर्मनाथ बीजेला यावर्षी ७५ वर्षे पूर्ण होत असून याची सुरुवात वै.किसन बाबा यांनी केलेली आहे. त्यानिमित्त गोरक्षनाथ गडावर प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी मोठ्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. म्हणून वै. किसन बाबा यांचे नाव घेतले जाते. त्यांच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली असून ह.भ.प. शांतीब्रह्म नवनाथबाबा यांच्या मार्गदर्शनाखाली या तीर्थक्षेत्राची महती आणि महत्त्व वाढू लागले ▶▶ उर्वरित पान २ वर

# देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा होणार असताना पाटोद्यात शासकीय कार्यालयांत मात्र अद्याप मूलभूत सुविधाच नाहीत



**पाटोदा । प्रतिनिधी**

देशभरात प्रजासत्ताक दिन धूमधडाक्यात साजरा करण्यासाठी सर्व यंत्रणा जोमाने काम करत असताना पाटोद्यातील शासकीय कार्यालयांची अवस्था मात्र चिंताजनक आहे. शासकीय कार्यालयात स्वच्छ पाणी नाही,सामान्य नागरिकांसाठी शौचाल तर दिव्यांगांसाठी रॅम नाहीत यामुळे दिव्यांगांना कामकाजात खुप त्रास सहन करावा लागतो ही गंभीर परिस्थिती बीड जिल्हातील पाटोदा तालुक्यातील तहसिल व पंचायत समिती सारख्या मुख्यकार्यालयाची आहेत तर पाटोदा तालुकाच्या इतर विकासावर न बोललेले बरंय



*माजलगाव सांगली अर्बन बँक माजलगाव शाखेत आज बँकेच्या वर्धापन दिना निमित्त मा. कै म. ह. तथा अण्णासाहेब गोडबोले यांचे प्रतीमा पूजन करून आयोजित रक्तदान शिबीर चे उदघाट्न करताना भाजपा नेते श्री ज्ञानेश्वर नाना मेंडके, डॉ. राधाकृष्ण डाके सर,नगरसेवक डॉ. सचिन देशमुख कैलास खुर्पे, शाखा सल्लागार डॉ सुशिल लोढा, ॲड. आदित्य चौकीदार दयानंद कासट, दत्ता महाजन यांचे उपस्थिती संपन्न झाले. बँकेचे मॅनेजर व कर्मचारी वर्ग*

# ग्रामीण भागातील अस्थिरांग प्रवर्गातील दिव्यांगांना मिळणार मोफत तीन चाकी स्कूटर विथ अडॅप्टर

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये ५% दिव्यांग कल्याणासाठी राखीव निधी मधून अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांगांना मोफत ३ चाकी स्कूटर विथ ॲडॅप्टरचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर योजनेचे अर्ज सर्व पंचायत समिती, संबंधित तालुका स्तरावर दिनांक १४/०१/२०२६ ते दिनांक २१/०१/२०२६ या कालावधीमध्ये स्वीकारण्यात येणार आहेत. सदर अर्ज पंचायत समिती स्तरावर विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सदर योजनेसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत. आधार कार्ड / मतदान कार्ड, UDID कार्ड (कम्पल्सरी), अस्थिव्यंग दिव्यांगाचे online प्रमाणपत्र (४०% पेक्षा जास्त), रहिवासी पुरावा (ग्रामसेवक यांचे), बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँकेचे), शौचालय वापरत असल्याबाबत प्रमाणपत्र, लहान कुटुंब प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र सन २०२५-२६ (तहसीलदार यांचे १लक्ष पर्यंत), पूर्वी लाभ न घेतल्याचे शपथपत्र, वयोमर्यादा किमान १८ पूर्ण व जास्तीत जास्त ५० पेक्षा कमी. उपरोक्त अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींनी अर्ज सादर करावेत. सदर योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ऊइढ द्वारे लाभ देण्यात येणार आहे. अर्जाच्या प्रमाणात लकी डॉ पद्धतीने निवड करण्यात येणार आहे. लाभार्थी निवड प्रक्रिया खालील उदिष्टानुसार राहील. तालुका - आष्टी - २, पाटोदा - २, शिरूर कासार - २, बीड - २, माजलगाव - २, केज - २, अंबाजोगाई - २, परळी - २, वडवणी २ धारूर २ गेवराई २ अशा प्रकारे एकूण २२लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. तरी १ ते १० अटींची पूर्तता करणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करावेत. असे आवाहन श्रीमती प्रियाराणी पाटील, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी केले आहे.

# यशवंत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ हे होते. तर उद्घाटक म्हणून शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शिका सौ सुधामतीताई वाघ ह्या होत्या. प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव नामदेव वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री धुमाळ एम.एस., श्री शरदचंद्र विद्यामंदिर या शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद गायकवाड, मथुराबाई पिंगळे विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल मुळूक, माऊली प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष माने, समर्थ गुरुकुल चे संचालक घाडगे, आई गुरुकुल चे संचालक जाधव, न्यू मानस गुरुकुल चे संजय सुरवासे पार्थ गुरुकुलचे भिंगले सर हे उपस्थित होते. या वेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश वाघ यांनी सांगितले की, स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना एकत्रित काम करण्याची सवय लागते आणि यातून नवीन कलाकार घडू शकतो. तसेच संस्थेचे संस्थापक सचिव ▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाईकरांना दिलासा: नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडांची वचनपूर्ती, आता सहा दिवसाला पाणीपुरवठा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईकरांना पाणीपुरवठ्या बाबत दिलेले आश्वासन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी अवघ्या काही दिवसांतच पूर्ण केले आहे. शहरात यापूर्वी १२ ते १३ दिवसांच्या अंतराने होणारा पाणीपुरवठा आता सहा दिवसांवर आला असून, यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. निवडणूक काळात शहराचा पाणीप्रश्न सोडवण्याचे आणि पाणीपुरवठ्याचा कालावधी कमी करण्याचे वचन मुंदडा



यांनी दिले होते, त्याची प्रभावी अंमलबजावणी आता प्रत्यक्ष सुरू झाली आहे. ▶ उर्वरित पान २ वर

**➧ स्वच्छतेवरही भर– पाणीपुरवठ्यासोबतच शहराची स्वच्छता आणि दिवाबत्तीच्या प्रश्नांनाही मुंदडा यांनी प्राधान्य दिले आहे. स्वच्छता विभागात सुसूत्रता आणण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू झाले असून, लवकरच हे कामही सुरळीत होईल असे त्यांनी सांगितले.**

**➧ प्रशासनाही लागतेय शिस्त– नगराध्यक्षांनी कार्यभार हाती घेतल्यापासून नगर पालिका प्रशासनातही शिस्त पाहायला मिळत आहे. कर्मचाऱ्यांना वेळेवर कार्यालयात उपस्थित राहणे आणि पूर्णवेळ थांबणे सक्तीचे करण्यात आले आहे. नागरिकांची कामे विनाकारण प्रलंबित राहू नयेत आणि प्रशासकीय कामात गतिमानता यावी, यासाठी मुंदडा यांनी कडक पावले उचलली आहेत. या बदलांमुळे अंबाजोगाई नगर पालिका प्रशासनाचा कारभार आता सुलभ होताना दिसत आहे.**

# अंजनडोह येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मौजे अंजनाडोह येथे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या रासेयोजनेच्या सुरू असलेल्या विशेष वार्षिक शिबिरामध्ये अंजनडोह ग्रामस्थ व नागरिकांसाठी मोफत आरोग्य विषयक तपासणी शिबिर धारूर ग्रामीण रुग्णालयातील प्रभारी वैद्यकीय अधिकारी श्री. बाळासाहेब सोळंके यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिराचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाडमध्ये किशोरी इंग्लिश स्कूलला तीन गोल्ड मेडल

## आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिक्षेत ३० विद्यार्थ्यांचा सहभाग, शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका

**बीड । प्रतिनिधी**

किशोरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड (खचज) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका वाजवला आहे. नोव्हेंबर महिन्यात पार पडलेल्या या प्रतिष्ठित परीक्षेत शाळेतील एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे किशोरी इंग्लिश स्कूलचा शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून तब्बल ३ विद्यार्थ्यांनी या परिक्षेत गोल्ड मेडल पटकावले आहे. इयत्ता पहिलीतील अनय कल्याणी आदित्य सारडा या विद्यार्थ्याने ९२.५० टक्के गुण




मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर १५ वा तसेच झोनल स्तरावर १५ वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला आहे. इयत्ता पहिलीतीलच राघव संध्या सचिन खर्डेकर याने ८५ टक्के गुणांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर ११४ वा आणि झोनल स्तरावर १०१ वा क्रमांक मिळवत शाळेतून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी अनिका पूजा दीपक भल्ला हिने ८९.७० टक्के गुण मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर ७५० वा आणि झोनल स्तरावर ५५० वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या यशात मानाचा वाटा उचलला आहे. या यशाबद्दल शाळेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# दिगंबरानुचर उपाख्य सर्वज्ञ दासोपंत विरचित ग्रंथराज (मराठी ओवी-गद्य अनुवाद-अर्थ) या ग्रंथाचे शुक्रवारी प्रकाशन

## भागवताचार्य पूज्य श्री.रमाकांतजी व्यास, आमदार सौ.नमितातार्इ मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती ; ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास उपस्थित रहावे – दासोपंत संशोधन मंडळाचे आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने दिगंबरानुचर उपाख्य सर्वज्ञ दासोपंत विरचित ग्रंथराज (मराठी ओवी-गद्य अनुवाद-अर्थ) या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा येत्या शुक्रवारी भागवताचार्य पूज्य श्री.रमाकांतजी व्यास, आमदार सौ.नमिताताई मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. तरी या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात येत आहे.




दासोपंत संशोधन मंडळ, अंबाजोगाई यांच्या वतीने दिगंबरानुचर उपाख्य सर्वज्ञ दासोपंत विरचित ग्रंथराज (मराठी ओवी-गद्य अनुवाद-अर्थ) या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी वेळ - सायंकाळी ६.०० वाजता, स्थळ - दासोपंत संशोधन मंडळ, देवघर परिसर, देशपांडे गल्ली, अंबाजोगाई या ठिकाणी होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा (विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य.) या आहेत, तर मा.पूज्य श्री.रमाकांतजी व्यास (भागवताचार्य), नंदकिशोर मुंदडा (अध्यक्ष, नगरपरिषद, अंबाजोगाई.), आणि सौ.पद्मश्री धर्माधिकारी (अध्यक्षा, नगरपरिषद, परळी वैजनाथ) यांच्या शुभहस्ते ग्रंथ प्रकाशन करण्यात येईल, याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून राजाभाऊ धाट (संस्थापक विश्वस्त, दासोपंत संशोधन मंडळ), ॲड.विष्णु कऱ्हाड (दत्तभक्त व दत्त साहित्य अभ्यासक), ह.भ.प.किसन महाराज पवार (अध्यक्ष, मुकुंदराज भजनी मंडळ, अंबाजोगाई), गदाधरबुवा रामदासी (मठाधिपती, राममंदिर, भटगल्ली, अंबाजोगाई), कृष्णाबुवा रामदासी (मठाधिपती, राममंदिर, खडकपुरा, अंबाजोगाई), ष.ब्र.१०८ श्री.शंभूलिंग ▶▶ उर्वरित पान २ वर

# 14 वर्षाच्या मुलीचा अम्ला गावात बालविवाह रोखला..

# AHTU ने मुलीला ताब्यात घेवून पो.स्टे. तलवाडा येथे केला गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

याबाबत सविस्तर बातमी अशीकी, दिनांक१९/०१/२०२६ सोमवारी सकाळी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या प्रभारी अधिकारी, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दिनांक ०५/०१/२०२६ रोजी आम्ला ता. गेवराई जि. बीड येथे एका १४ वर्षाच्या मुलीचा बालविवाह झाला आहे व तिथेच आज सत्यनारायणाची पूजा आहे. त्यावरून, -क्ढण टीम अम्ला गावात दाखल झाली. मिळालेल्या माहितीनुसार बालविवाह झालेल्या घरी टीम गेली असता, पोलीस



आल्याचे बघून सर्व पाहुण्यांनी इकडे तिकडे सैरा वैरा पळू लागले. व मुलीला कुठेतरी लपवून ठेवले. झडख पल्लवी जाधव यांनी मुलीचा घरात व इतरत्र शोध घेतला पण ती मिळून आली नाही. इथे बालविवाह झालाच नाही असा घरातल्या लोकांनी बनाव केला. विवाह झालेला व्यक्ती पळ काढेल तोच त्याला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता इथे काही झालेच नाही किंवा मी तो व्यक्ती नाहीच अस तो दाखवत होता. परंतु झडख पल्लवी जाधव यांच्याकडे लग्न झाल्याचा पुरावा असल्याबाबत सांगितले व लग्नाचा फोटो माझ्याकडे आहे असे सांगितले. मग त्याने घाबरून कबुली दिली. सदर व्यक्तीचे नाव कृष्णा उर्फ बबन अनुरुद्र वरबडे वय ३० वर्ष रा. आम्ला ता. गेवराई जि. बीड असे सांगितले. तसेच पिडीत मुलगी ही १४ वर्षाची असून माझ्या मामाची ▶▶ उर्वरित पान २ वर

